Ministry of Housing and Urban Affairs
Government of India

**स्वच्छता हीच आपली ओळख**

# स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अहवाल

## विटा नगरपरिषद विटा



## विटा शहराला मिळाला महामहीम राष्ट्रपतींच्या हस्ते स्वच्छतेचा ताज

### संपूर्ण देशभरात स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत सुपर स्वच्छ लीग मध्ये २०००० ते ५०००० लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांकाने मिळाला बहुमान

**विटा शहरास कचरामुक्त शहर अभियानामध्ये ५ स्टार मानांकन**

**हागणदारीमुक्त शहर अभियानात ODF ++ चा दर्जा प्राप्त**



स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये विटा शहराने **सुपर स्वच्छ लीग मध्ये २०००० ते ५०००० लोकसंख्या गटामध्ये** देशात प्रथम क्रमांक पटकवला असून दिनांक १७ जुलै २०२५ रोजी विटा शहराला विज्ञान भवन दिल्ली येथे माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करून स्वच्छतेचा ताज देऊन गौरविण्यात आले. शहरी गृहनिर्माण व विकास मंत्रालयाने यावर्षी 'स्वच्छ सर्वेक्षण 2024' करिता गुणांकन पध्दती बदललेली असून 'सुपर स्वच्छ लीग'ही नवीन विशेष कॅटेगरी निर्माण केली आहे. स्वच्छतेत नेहमीच अग्रभागी असणा-या शहरांऐवजी इतरही शहरांना क्रमवारीत पुढे येण्याची संधी मिळावी यादृष्टीने 'स्वच्छ सर्वेक्षण 2023' पर्यंत जी शहरे लागोपाठ 3 वर्षे रँक मध्ये आहेत अशा शहरांसाठी 'सुपर स्वच्छ लीग' ही क्रमवारीपेक्षा उच्च अशी विशेष कॅटेगरी निर्माण

करण्यात आली आहे. यामध्ये वीस हजार ते 50 हजार लोकसंख्या गटामध्ये विटा शहराने सुपर स्वच्छ मानांकन मिळवले असून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे विटा शहर आता स्वच्छ शहरांच्या क्रमवारीपेक्षा उच्च स्थानावर ‘सुपर स्वच्छ लीग’ मध्ये मानांकन प्राप्त करीत आपली विजयपताका कायम फडकत ठेवली आहे. यासोबतच कचरामुक्त शहराचे 5 स्टार मानांकन’ तसेच हागणदारी मुक्त कॅटेगरीमध्ये ODF++’ मानांकन विटा शहराने कायम राखले आहे.

विटा शहराच्या या सातत्यपूर्ण स्वच्छता कार्याचा सन्मान 17 जुलै 2025 रोजी नवी दिल्ली येथे विज्ञान भवनात संपन्न झालेल्या ‘स्वच्छ सर्वेक्षण 2024’ पारितोषिक वितरण सोहळ्यात महामहिम राष्ट्रपती श्रीम.द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते, केंद्रीय गृहनिर्माण न शहरी व्यवहार मंत्री ना.श्री.मनोहरलाल खट्टर, राज्यमंत्री ना.श्री.तोखन साहू व सचिव श्री. श्रीनिवास करिकीथाला यांच्या प्रमुख उपस्थितीत, महाराष्ट्र राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री ना.श्रीम.माधुरी मिसाळ व विटा नगर परिषद मुख्याधिकारी श्री विक्रमसिंह पाटील व उपमुख्य अधिकारी श्री स्वप्निल खामकर यांनी स्विकारला.

यासोबतच विटा शहराने कचरामुक्त शहर ५ स्टार व हागणदारी मुक्त शहर ODF ++ आदी नामांकने देखील मिळवले आहेत. आपले विटा शहर कचरा कुंडी मुक्त, कचरा मुक्त, प्लास्टिक मुक्त व हागणदारीमुक्त, वराह मुक्त असून विटा शहरातील प्रत्येक नागरिकाला याचा सार्थ अभिमान आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०१९ , २०२० , २०२१, २०२२ व २०२३ मध्ये देखील विटा शहराला कचरा मुक्त शहर 3 स्टार व हागणदारी मुक्त शहर (ओडीएफ प्लस प्लस) म्हणून सलग ५ वर्षे मानांकने मिळालेली आहेत. विटा शहर स्वच्छतेच्या शर्यतीत नेहमीच अग्रेसर राहिले असून स्वच्छ सर्वेक्षण 2020 मध्ये नगर परिषदेला पश्चिम भारतात बेस्ट इंनोवेशन अंड प्रॅक्टिसेस मध्ये प्रथम क्रमांक मिळालेला आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2019 मध्ये विटा नगरपरिषदेला 25 ते 50 हजार लोकसंख्या गटामध्ये पश्चिम भारतात प्रथम क्रमांकाने सर्वात स्वच्छ शहर म्हणून दर्जा मिळाला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये आपले विटा शहरास स्वच्छतेच्या शर्यतीत १ लाख पेक्ष्या कमी लोकसंख्या गटामध्ये देशात प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले आहे.

## सुपर स्वच्छ लीग मधील ऐतिहासिक मानांकनाचे श्रेय सर्वांचे – प्रशासकांचे प्रतिपादन

विटा शहराच्या या स्वच्छ सर्वेक्षणातील 'सुपर स्वच्छ लीग' मधील समावेशाचे व त्यामधील उच्च मानांकनाचे श्रेय प्रशासक डॉ. विक्रम बांदल यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद, शहर स्वच्छ ठेवण्याकरिता अहोरात्र झटणारे स्वच्छतामित्र, सामाजिक संस्था, महिला बचत गट, पत्रकार बंधू, लोकप्रतिनिधी, तरुण मंडळे, सर्व शाळा महाविद्यालय शिक्षक व विद्यार्थी, स्वच्छताप्रेमी विटेकर नागरिक, विविध क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था व असोसिएशन, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, सर्व कंत्राटदार अशा सर्व घटकांचा सक्रिय सहभाग यांना दिलेले आहे.

विटा नगरपरिषदेने नेहमीच नाविन्यपूर्ण आणि सर्वसमावेशक असे स्वच्छता उपक्रम राबवित इतर शहरांसाठी एक मापदंड प्रस्थापित करून दिलेला आहे.

'स्वच्छ सर्वेक्षण 2024' ला सामोरे जाताना 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये समावेशासाठी 85 टक्केपेक्षा अधिक गुणांकन राखणे अनिवार्य होते. त्यातही विटा नगरपरिषदेने प्रशासक डॉ. विक्रम बांदल व मुख्याधिकारी श्री विक्रमसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागावर भर देत अनेक उल्लेखनीय प्रकल्प राबविले, उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले आणि 'सुपर स्वच्छ लीग' या सर्वोच्च कॅटेगरीमध्ये आपला समावेश निश्चित केला. अशा प्रकारच्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करिता अत्याधुनिक कार्यप्रणालींचा वापर करून तसेच स्वच्छताविषयक नानाविध उपक्रम राबवून विटा नगरपरिषद नेहमीच देशव्यापी स्वच्छ सर्वेक्षणात अव्वल स्थान मिळविण्यासाठी आघाडीवर राहिली आहे. त्यामुळेच यावर्षी 'स्वच्छ सर्वेक्षण 2024' मध्ये सातत्याने अग्रक्रम मिळविणा-या शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग' या स्पेशल कॅटेगरीत विटा शहराचा समावेश करण्यात आला असून स्वच्छ शहरांतील नंबरच्या स्पर्धेपेक्षा उच्चतम स्थान विटा नगर परिषदेस प्राप्त झाले आहे. ही संपूर्ण विटेकरांसाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगत प्रशासक व मुख्याधिकारी विटा नगर परिषद विटा यांनी समस्त नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

# विटा नगरपरिषद, विटा

स्वच्छ सर्वेक्षण 2024

जि. सांगली (ULB Code : 802893)

Meri LiFE Lifestyle for Environment

# विटा शहर तपशील

| अ. क्र. | निकष | उपलब्ध संख्या | | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ अ | **शहरातील मध्यवर्ती चौक, प्रमुख रस्ते सुस्थितीत आणणे व सुशोभिकरण करणे** | शुशोभित चौक संख्या | ३ | १. छ. शिवाजी महाराज चौक<br>२. आंबेडकर नगर चौक<br>३. क्रांतिसिंह नाना पाटील पुतळा चौक |
| | | **प्रमुख रस्ते** | ३ | १. कराड रोड<br>२. सांगली रोड<br>३. नेवरी सातारा रोड |
| १ ब | **ब. प्रमुख इमारती, प्रमुख वारसा स्थळे (हेरिटेज इमारती), तलाव, जलाशये व विहिरी यांची देखभाल करणे.** | **प्रमुख इमारती** | ४ | १. विटा नगरपरिषद<br>२. विटा पोलीस स्टेशन<br>३. दिवाणी व फौजदारी न्यायालय विटा<br>४. मध्यवर्ती प्रशासकीय इमारत |
| | | **प्रमुख वारसा स्थळे (हेरिटेज इमारती)** | २ | १. नाथ मंदिर<br>२. रेवणसिद्ध मुळस्थान मंदिर |
| | | **तलाव** | २ | १. वसंत नगर तलाव<br>२. विवेकानंद नगर तलाव |
| | | **जलाशये व विहिरी** | १ | १. ८००० विहीर |
| २ | **घरोघरी जाऊन १०० टक्के विलगीकृत कचरा संकलन करणे** | • मार्ग मॅपिंगसह<br>• जीपीएस ट्रॅकिंग व मासिक तपशीलवार अहवाल | | एकूण १२ ward मध्ये रहिवासी व व्यापारी भागात कचरा 100% विलागीकृत कचरा संकलित केला जातो |
| ३ | **शहरात प्लास्टिक बंदी अंमलबजावणी करणे** | | | व्यापारी भाग येथे प्लास्टिक बंदी कारवाई मोहीम केली जाते |

स्वच्छ विटा हरित विटा सुंदर विटा

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **शहरातील प्रमुख रस्त्यावरील अतिक्रमणांवर कार्यवाही** | प्रमुख रस्ते = ३ | १. कराड रोड<br>२. मायणी रोड<br>३. खानापूर रोड |
| ५ | **मालमत्ता कर संकलन, स्थावर जंगम मालमत्तेच्या विनियोगाचे व्यवस्थापन/ नगरपरिषदेचे आर्थिक नियोजन** | | 1)विटा नगरपरिषदेकडून सन 2023-24 मध्ये मालमत्ता चतुर्थ वार्षिक कर आकारणीची कार्यवाही सुरु आहे.<br>२)दुकानगाळे भाड्यात वाढ करणेत आली आहे .<br>3) नगरपरिषदेने केलेल्या उपविधीनुसार विविध फी आकारण्यात आली आहे<br>4) अनधिकृत बांधकामवर अनधिकृत बांधकाम कर आकारणी करण्यात येतो.<br>5) बाजार वसुली फी चे दर वाढविण्यात आले आहेत.<br>6) नवीन जाहिरात धोरण निश्चित केले आहे.<br>7) नगरपरिषद मालकीच्या भाड्याने दिलेल्या मालमत्तांचे वेळोवेळी मूल्य निर्धारण करण्यात येत आहे. |
| ६ | **सार्वजनिक वाचनालयाची उपलब्धता व व्यवस्थापन** | 2 | १. नगर वाचनालय विटा<br>२. मुक्तांगण वाचनालय विटा |
| ७ | **स्वच्छता कर्मचाऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ देणे** | सर्व न प स्वच्छता सफाई कर्मचारी यांना ३ व ३ पेक्षा जास्त शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.<br><br>एकूण कर्मचारी = १८५ | १. प्रधान मंत्री जन धन योजना<br>२. प्रधान मंत्री आयुष बिमा योजना<br>३. प्रधान मंत्री जीवन ज्योती बिमा योजना<br>४. प्रधान मंत्री सुरक्षा बिमा योजना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Permanent = 20<br>Contractual = 119<br>Informal waste picker = 46 | ५. रेशन कार्ड |
| ८ | **शहरातील पदपथांवरील तसेच इतर ठिकाणांवर Street Furniture बसविणे व सौंदर्यीकरण करणे (place making).** | शहरात विविध ६ ठिकाणी Street Furniture बसविण्यात आले आहे. | १. यशवंतनगर बगीचा<br>२. शाहू नगर बगीचा<br>३. Waste बेस्ट गार्डन<br>४. कुंडल रोड<br>५. आंबेडकर नगर चौक<br>६. प्रांत कार्यालय रोड |
| ९ | **शहराने राबविलेली नाविन्यपुर्ण योजना** | ७ | **१. ICT & Solar Based Smart Urinal**<br>**२. ICT & Solar Based Smart Twin Bin**<br>**३. IOT Based Solar Powered Water Trash Cleaner**<br>**४. Air Purifier**<br>**५. कापडी पिशवी केंद्र**<br>६. विटा नगरपरिषद कार्यालयात २० kw क्षमतेचे Ongrid (नेट मीटरिंग) सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यात आलेला आहे.<br>७. विवेकानंदनगर येथे १० kw क्षमतेचे पंप हाऊसला नेट मिटरिंग करणे काम प्रस्तावित आहे |
| १० | **फेरीवाला विरहित क्षेत्र/फेरीवाला क्षेत्र निश्चित करणे** | फेरीवाला विरहित क्षेत्र २<br>फेरीवाला क्षेत्र २ | चौंडेश्वरी मंदिर समोर<br>मायणी रोड |
| ११ | **सार्वजनिक वाहन तळ -** | रिक्षा/टॅक्सी स्टँडची | १. विटा बस स्थानक शेजारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | **रिक्षा/टॅक्सी स्टँडची ठिकाणे निश्चित असणे व त्यांची व्यवस्थित निगा राखणे** | ठिकाणे ३<br>सार्वजनिक वाहन तळ - १ | २. चौंडेश्वरी मंदिर शेजारी<br>३. छ. शिवाजी महाराज चौक येथे<br><br>वाहन तळ नगर परिषद समोर |
| १२ | **सार्वजनिक वाहतुक व्यवस्था - सुस्थितितील वाहने, वेळापत्रके, सुरक्षित व आच्छादित बसथांबे** | १ | विटा एस टी बस स्थानक |
| १३ | **सार्वजनिक व्यावसायिक व व्यापारी केंद्र- स्वच्छता व सुविधा, प्रसाधनगृहांची उपलब्धता** | सार्वजनिक व्यावसायिक व व्यापारी केंद्र | शासकीय २ व्यापारी संकुल<br>अशासकीय ३ जसे कि सूर्य mart |
| १४ | **पाणीपुरवठा व जल शुध्दीकरण प्रकल्प पुर्णक्षमतेने कार्यान्वित** | १ | विटा शहरात संपूर्ण शहरात पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा केला जातो १०.८५ मिलियन लिटर प्रति दिन इतका क्षमतेचे जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित आहे. |
| १५ | **मलजल शुध्दीकरण प्रकल्प पुर्णक्षमतेने कार्यान्वित** | १ | १० KLD क्षमतेचा मलजल शुध्दीकरण प्रकल्प पुर्णक्षमतेने कार्यान्वित |
| १६ | **तीर्थस्थळ/वारसास्थळाची जपणूक करणे** | १ | रेवणसिद्ध मूळस्थान |
| १७ | **भुयारी गटारांवर मॅनहोल झाकणे सुस्थितीत असणे** | | विटा शहरात भुयारी गटारे योजना प्रक्रिया चालू आहे. |
| १८ | **सार्वजनिक उद्याने - स्थानिक उद्यानांची निगा राखणे - मुलांसाठी खेळण्याची साधने असणे व ती सुस्थितीत राखलेली असणे** | सार्वजनिक उद्याने ११ | प्रमुख उद्याने :<br>१. यशवंतनगर बगीचा<br>२. शाहू नगर बगीचा<br>३. Waste बेस्ट गार्डन |
| १९ | **रस्त्यांची देखभाल व सुशोभिकरण, दिशा दर्शक फलक, लेन मार्किंग, स्ट्रीट** | दिशा दर्शक फलक (संख्या) = ३७<br>लेन मार्किंग | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **लाईट (पथ दिवे), सीसीटिव्ही व्यवस्था कार्यान्वित असणे** | (संख्या) = १५<br>सीसीटिव्ही<br>(संख्या) २७<br>स्ट्रीट लाईट (पथ दिवे)<br>(संख्या) ५१ | |
| २० | **कंपोस्ट निर्मितीस हरित ब्रँड प्राप्त असणे** | अंदाजे ३.९ ते ४ टन निर्मिती | हरित ब्रंड प्राप्त |
| २१ | **आरोग्य सुविधा - रुग्णालय सेवा, प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध असणे** | एकूण ५ | ग्रामीण रुग्णालय १<br>नागरी आयुष्मान केंद्र ३<br>प्राथमिक आरोग्य केंद्र १ |
| २२ | **राष्ट्रीय / राज्य पातळीवर मिळालेले पारितोषिक - स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा इत्यादि** | एकूण ७ अवार्ड | ❖ स्वच्छ सर्वेक्षण २०२२ – देशात ६ वा तसेच पश्चिम विभागात २ रा क्रमांक प्राप्त<br>❖ स्वच्छ सर्वेक्षण २०२१ - National 1st rank (Below 1 lakh population)– (1st Price)<br>❖ स्वच्छ सर्वेक्षण २०२० - West Zone (1st Price) – Best city in Innovation & Best Practices<br>❖ स्वच्छ सर्वेक्षण २०१९ - West Zone (25000-50000 population)– Cleanest City (1st Price)<br>❖ SKOCTH AWARD 2021<br>❖ 2017-best Nagarparishad Award Pune Division<br>❖ Sant Gadagebaba Gram Swachhta Abhiyaan |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Award |
| २३ | **शाळा परिसराची स्वच्छता, सौंदर्यीकरण, प्रसाधनगृहे उपलब्ध असणे** | | सर्व शाळा मध्ये उपलब्ध |
| २४ | **क्रीडांगणे सुस्थितीत असणे व क्रीडा साहित्याची उपलब्धता** | २ | १. न. प. शाळा क्रमांक २ विटा<br>२. बळवंत कॉलेज विटा |
| २५ | **ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र असणे** | १ | जुनी नगरपालिका आबासाहेब पाटील सभागृह |

## विटा शहराची स्वच्छ शहर मधील कामगिरी

| Year of Participation | SS National Ranking | GFC star rating | ODF status |
|---|---|---|---|
| 2018 | 25 | NA | ODF |
| 2019 | 4 | 3 star | ODF+ |
| 2020 | 17 | 3 star | ODF++ |
| 2021 | 1 | 3 star | ODF++ |
| 2022 | 6 | 3 star | ODF++ |
| 2023 | 7 | 3 star | ODF++ |
| 2024 | Super Swachh League | 5 star | ODF++ |

# विटा नगरपरिषद, विटा

जि. सांगली (ULB Code : 802893)

## Growth of Swachhta in Vita City....One step towards Swachhta...

❖ **SS 2021- National 1st rank (Below 1 lakh population)– (1st Price)**



❖ **SS 2020 - West Zone (1st Price) – Best city in Innovation & Best Practices**





स्वच्छ विटा हरित विटा सुंदर विटा

- SS 2019- West Zone (25000-50000 population)– Cleanest City (1st Price)




- SKOCTH AWARD 2021
- 2017-best Nagarparishad Award Pune Division
- Sant Gadagebaba Gram Swachhta Abhiyaan Award
- ISO 9001 : 2015
- HARIT CERTIFICATION
- Slum free City- Pig free city
- Bin free city
- City of gold




## ❖ स्वच्छ सर्वेक्षण चे मुल्यांकन कसे केले जाते ?

स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेमध्ये विविध घटकांवरती शहराचे मूल्यांकन केले जाते. यामध्ये शहर स्वच्छता, रहिवासी, व्यापारी व सार्वजनिक भागाची नियमित स्वच्छता, सामुदायिक व सार्वजनिक शौचालय स्वच्छता व व्यवस्थापन, डिजिटल सेवा सुविधा, शहराचे सुशोभीकरण , घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मैला व्यवस्थापन, शहरातील विविध आस्थापना व नागरिकांचा सहभाग व जनजागृति, 3R प्रणाली, 100% कचरा वर्गीकरण, कलेक्शन व प्रोसेसिंग, होम कम्पोस्टिंग, नाले तलाव व्यवस्थापन व स्वच्छता, शाळा महाविद्यालय स्वच्छता व्यवस्थापन अशा अनेक स्वच्छताविषयक घटकांचा समावेश केला जातो.

चालू वर्षी स्वच्छ सर्वेक्षण हे एकूण १२५०० गुणांचे होते त्यापैकी स्वच्छता व्यवस्थापन विषयक घटक १०००० (८०%) तर कचरामुक्त शहर मानांकन (GFC) व हागणदारीमुक्त शहर मानांकन (ODF) प्रमाणपत्रे २५०० (२०%) गुणांकरिता ठेवण्यात आले होते. हे सर्व घटक शहराच्या सर्वांगीण विकासाला पोषक असून याद्वारे संपूर्ण शहराचा शाश्वत विकास होण्यास मदत होते. विटा शहरांमध्ये देखील या सर्व घटकांवरती अतिशय उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले गेले असून शहराच्या विकासामध्ये या सर्व घटकांचा समावेश केला गेला आहे.

**DISTRIBUTION OF MARKS (12,500 MARKS)**



## DETAILED BIFURCATION SWACHH SURVEKSHAN (10,000 MARKS)

| Sections | % Marks | Marks | Indicators | Sub- Indicators |
|---|---|---|---|---|
| 1. Visible Cleanliness | 15% | 1500 | 13 | 31 |
| 2. Segregation, Collection & Transportation of waste | 10% | 1000 | 3 | 8 |
| 3. Solid Waste Management | 15% | 1500 | 11 | 25 |
| 4. Access to Sanitation | 10% | 1000 | 5 | 35 |
| 5. Used Water Management | 10% | 1000 | 5 | 8 |
| 6. Mechanization of desludging services | 5% | 500 | 3 | 19 |
| 7. Advocacy for Swachhta | 15% | 1500 | 5 | 17 |
| 8. Ecosystem Strengthening & Institutional Parameters | 10% | 1000 | 5 | 12 |
| 9. Overall Welfare of Sanitation Workers | 5% | 500 | 2 | 9 |
| 10. Citizen Feedback & Grievance Redressal | 5% | 500 | 2 | 2 |
| Total | | 10,000 | 54 | 166 |

### Certified GFC Star Rating Status

| Scheme of Ranking | Marks |
|---|---|
| 7 Star City (Water+ mandatory) Certified | 1,375 |
| 5 Star City (ODF++ mandatory) Certified | 1,175 |
| 3 Star City (ODF+ mandatory) Certified | 725 |
| 1 Star City (ODF mandatory) Certified | 525 |

### Certified ODF Status

| Scheme of Ranking | Marks |
|---|---|
| Water+ City | 1,125 |
| ODF++ City | 725 |
| ODF+ City | 525 |
| ODF City | 325 |

### ❖ आरोग्य विभाग कसे काम करते ?

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या स्वच्छतेच्या शर्यतीमध्ये मिळालेल्या यशामध्ये विटा शहरातील प्रत्येक घटकाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यावेळी कामाचे योग्य नियोजन व अंमलबजावणी होण्यासाठी विकेंद्रीकरण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. स्वच्छ सर्वेक्षण अनुषंगिक कामांच्या अंमलबजावणीकरिता वॉर्डनिहाय रचना करण्यात आलेले आहे. तसेच प्रत्येक वॉर्ड मध्ये जनजागृती संदर्भात विशेष टीमचे नियोजन देखील करण्यात आलेले आहे. यामुळे संपूर्ण शहरांमध्ये वॉर्डनिहाय उपक्रम राबविण्यात येतात. महिन्यातून एकदा प्रशासकिय व तज्ञ व्यक्तींच्या उपस्थितीत सर्व वॉर्ड मधील नियोजित व आयोजित उपक्रमांची आढावा बैठक घेण्यात येते.

शहरातील स्वच्छता करणेसाठी सफाई कर्मचारीना देखील प्रभाग वाटून देण्यात आलेले असून रहिवासी भागात रोज सकाळी एकदा व व्यापारी तसेच सार्वजानिक भागात दिवसातून दोनदा स्वच्छता केली जाते. शहरातील सर्व सामुदायिक व सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता रोज दिवसातून दोनदा केली जाते. सर्व सफाई कामगारांना घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देण्यात येते व सोबतच व्यक्तिगत स्वास्थ्य व सुरक्षा साहित्य देऊन आरोग्य तपासणी देखील केली जाते.

विटा शहरांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व कचरा वाहक घंटागाड्या यांना जीपीएस बसविले असून ICT प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. तलाव स्वच्छतेसाठी सौर ऊर्जा आधारित ट्रॅश क्लिनर, सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालय येथे ऑटोमॅटिक सौर ऊर्जा आधारित विद्युत प्रणाली, शहरातील प्रत्येक चौकामध्ये कारंजे, प्लास्टिक मुक्त भाजी मंडई व व्यापारी भाग, सौर ऊर्जा आधारित रीसायकलेबल यूरिनल, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, कचरा निर्मितीच्या ठीकाणी १००% कचऱ्याचे विलगीकृत संकलन, १००% विलगीकृत कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया व आर्थिक उत्पन्न, वेस्ट पासून बेस्ट गार्डन, प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन, animal disposal machine, कापडी पिशवी मशीन, digital जनजागृती आदी असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले गेले आहेत.

❖ **घनकचरा व्यवस्थापन भूमी :**

विटा शहरामध्ये संपूर्ण रहिवासी व्यापारी भागातून शंभर टक्के वर्गीकृत कचरा घंटागाडी मध्ये घेतला जातो हा वर्गीकृत कचरा घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे पुढील प्रक्रियेसाठी पाठविला जातो या ठिकाणी प्रत्येक घंटागाडीचे वजन केले जाते.

घंटागाडीतील वर्गीकृत ओला कचऱ्यापासून हरित कंपोस्ट बनवले जाते. हे हरित खत शहरातील सर्व नागरिक, शेतकरी यांच्यासाठी विक्रीकरिता उपलब्ध ठेवले जाते. सुका कचरा कचरावेचकांच्या माध्यमातून विविध प्रकारांमध्ये जसे की कागद, कपडे, प्लास्टिक,काच, रबर, लाकूड, इलेक्ट्रॉनिक अशा विविध प्रकारात वर्गीकृत करून त्याची योग्य पद्धतीने साठवणूक केली जाते. वर्गीकृत प्लास्टिक कचऱ्यापासून ब्लॉक्स बनवले जातात. तसेच ओला कचऱ्यापासून पासून वीजनिर्मिती करून ती वीज घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील सर्व ठिकाणी वापरली जाते. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे विविध अत्याधुनिक मशिनरी चा वापर करण्यात आलेला आहे. शहरातील सेप्टीक टॅंक मधून उचलला जाणारा मैला हा येथील एफएसटीपी प्रकल्पामध्ये पुढील प्रक्रियेसाठी पाठवला जातो व शहरातील हरित क्षेत्र व वृक्षारोपण केलेल्या ठिकाणी, कारंजे इ. ठिकाणी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केला जातो. तसेच शहरातील जमा झालेल्या सॅनेटरी वेस्ट वरती शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जाते. तसेच मेलेले जनावरे यांच्या वर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियाकरिता आधुनिक प्रदूषणविरहित disposal machine बसविण्यात आली आहे.

विटा नगर परिषदे मार्फत आधुनिक तंत्रज्ञानाचा व नाविन्यपूर्ण उपक्रमांचा वापर करत शून्य कचरा या दिशेने वाटचाल करून घनकचरा व्यवस्थापन भूमि प्रदूषण मुक्त व हरित करण्यात आलेली आहे.

तसेच शहरातील बांधकामाच्या ठिकाणी पडणारा राडारोडा हा नगर परिषदेमार्फत विशेष वाहनाच्या माध्यमातून संकलित केला जातो व घनकचरा व्यवस्थापन भूमी येते पाच विभागांमध्ये वर्गीकृत करून सदर राडारोडा हा शहरातील इतर बांधकामाच्या ठिकाणी भुभराव, सपाटीकरण अशा विविध कामांकरता पुनर्वापर केला जातो.

❖ **राबविण्यात आलेले विविध नाविन्यपुर्ण उपक्रम :**

**१ . सौर ऊर्जा आधारित ट्रॅश क्लिनर –**



विटा शहरातील तलाव व पाण्याचे स्त्रोत स्वच्छ करण्याकरिता सौरऊर्जा वरती चालणारे ट्रॅश क्लिनर वापरण्यात येत आहेत. यामुळे प्रदूषण न होता इंधन बचत होते. स्वच्छते सोबतच पर्यावरण संवर्धन दृष्टीकोनातून अभियांत्रिकी सांगड घालण्यात आली आहे.

**२. ICT आधारित ट्विन बिन –**



सौर ऊर्जा वरती ICT प्रणाली आधारित ट्विन बिन सर्व व्यापारी व सार्वजनिक भागामध्ये बसविण्यात आलेले आहेत. यावरती नागरिकांना व बाहेर गावच्या ग्राहकांसाठी कचरा वर्गीकरण यासाठी मार्गदर्शक सूचना देखील दिल्या आहेत. यामध्ये सेन्सर बसविले असून स्वयंचलित कॉम्प्रेस प्रणालीचा देखील वापर केला आहे त्यामुळे ट्विन भरल्यानंतर त्याचा संदेश आरोग्य विभागाकडे पुरविला जातो व त्यानंतर त्यातील कचरा सफाई कर्मचाऱ्यांना मार्फत स्वच्छ केला जातो.

**३ . सौर ऊर्जा आधारित रीसायकलेबल यूरिनल –**




सार्वजनिक भागामध्ये सौर ऊर्जा व आईसीटी प्रणाली आधारित रिसायकलेबल युरिनल बसवले असून यामध्ये युरीन चे पाण्या मध्ये रूपांतर करून ते पाणी फ्लशिंग साठी वापरले जाते. तसेच या वरती जाहिरात फलक देखील देण्यात आलेला आहे ज्यावरून स्वच्छतेचे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवले जातात.  मध्ये स्वयंचलित विद्युत प्रणालीचा वापर करण्यात आलेला असून सर्व सिस्टीम सेन्सर आधारित आहे.

**४ . प्रशिक्षण व कपॅसिटी बिल्डिंग –**



विटा नगर परिषदेमध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन याकरिता काम करत असणाऱ्या सर्व सफाई कामगारांना प्रतिमहिना प्रशिक्षण दिले जाते तसेच त्यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या सुरक्षितेसाठी

सर्व सुरक्षा साहित्य म्हणजेच पीपीई किट देखील पुरविले जातात. सफाई कर्मचारी स्वच्छ भारत अभियान चा पाया असून नगर परिषदेकडून त्यांना शासकीय योजनांचा लाभ करून देण्यात आलेला आहे

**५ . स्वच्छतेची लोकचळवळ** –

विटा नगर परिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सर्व जनजागृती व प्रबोधन पर उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग असून शहरांमध्ये स्वच्छतेची लोक चळवळ सुरू झाली आहे माझा कचरा ही माझी जबाबदारी आहे असे समजून सर्व नागरिक अगदी प्रामाणिकपणे त्यांचे कर्तव्य व जबाबदारी पार पाडत आहेत स्वच्छ भारत अभियान चा व राबविल्या गेलेल्या सर्व उपक्रमांचा नागरिकांच्या जीवनावरती प्रभाव पडला असून नागरिकांच्या सवयी देखील बदलल्या आहेत. तसेच शहरातील हात गाडे व छोटी दुकाने यांना पीएम स्वनिधी च्या अंतर्गत आर्थिक सहाय्य देखील देण्यात आले आहे.









**६. Waste To Best Garden**

विटा नगरपरिषदेच्या वतीने बागबगीचे येथे नागरिकांसाठी टाकावू वस्तू पासून बनविलेले विविध आकर्षक टिकावू वस्तू जसे कि सेल्फी स्कूटर, बेंच , टायर कार, स्नो बिअर,  अश्या विविध वस्तू बसविण्यात आलेल्या आहेत.















### ७. प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन

शहरात विविध सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक बॉटल क्रशिंग मशीन बसविण्यात आली आहे. यामुळे प्लास्टिक बॉटल क्रश होवून त्याचे सुक्ष्म तुकड्यात रुपांतर केले जाते जेणेकरून त्याचा उपयोग पुनर्वापर करिता करण्यात येतो. यामध्ये नागरिकांना कुपन देण्यात येते.





TODAY सांगली, शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०२४ सकाळ

**प्लास्टिक बाटली क्रशिंग मशीनचे लोकार्पण**

विटा नगरपरिषदेचा उपक्रम : नागरिकांना कुपनांवर मिळतात कापडी पिशवी

■ सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. १७ : प्लास्टिकमुळे प्रदूषण व शहराची दुरवस्था वाढत चालली आहे. व्यापारी भागात प्लास्टिक बाटल्या शहरामध्ये जिकडे तिकडे पडलेल्या दिसत आहेत. यावरती उपाय म्हणून विटानगर परिषदेच्या वतीने एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. व्यापारी व सार्वजनिक भागांमध्ये नागरिकांची रेलचेल जास्त असते.

त्यामुळे विटा नगर परिषदेच्या वतीने शहरातील दोन ठिकाणी विटा नगर परिषद समोरील व्यापारी भाग व भाजी मंडई येथे प्लास्टिक बाटल्या क्रशिंग मशीन बसवली आहेत. याचा लोकार्पण सोहळा प्रशासक डॉ. विक्रम बांदल व मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांच्याहस्ते संपन्न झाला.

'आय-स्मार्ट टेक्नोसोलुशन'द्वारा निर्मित हे प्लास्टिक बाटली क्रशिंग मशीनमध्ये प्लास्टिक बाटली टाकल्यानंतर त्याचे लहान तुकड्यांमध्ये रूपांतर करून हा कचरा मशीनमध्ये साठवला जातो. त्यानंतर या कचऱ्याचा घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे पेव्हिंग ब्लॉक्स बनविण्याकरता वापर केला जाणार आहे. या मशीनमध्ये प्लास्टिक बाटली टाकल्यानंतर नागरिकांना एक कूपन मिळते. असे एकूण दहा कूपन मिळाल्यानंतर नगरपरिषदेद्वारा एक कापडी पिशवी त्यांना मोफत मिळते. याद्वारे नागरिकांच्या मनात प्लास्टिकचा वापर कमीत कमी करून कापडी पिशवीचा वापर करण्याकरिता प्रोत्साहन मिळावे तसेच या मशीनद्वारे प्लास्टिक बॉटलचे रूपांतर पेव्हिंग ब्लॉक बनवण्याकरिता करून 'थ्रीआर' प्रणालीचा अवलंब नगर परिषदेद्वारा करण्यात आला आहे. विटा नगर परिषदेच्या वतीने हे मशीन नागरिकांसाठी खुले करण्यात आले असून याचा वापर जास्तीतजास्त नागरिकांनी करावा, असे आवाहन प्रशासक डॉ. विक्रम बांदल, मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांनी केले. यावेळी उपमुख्याधिकारी स्वप्नील खामकर, आरोग्य निरीक्षक नारायण शितोळे, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी, आय स्मार्ट टेक्नो सोल्युशनचे बाबू पवार व नागरिक उपस्थित होते.

विटा : येथे प्लास्टिक बाटल्या क्रशिंग मशीनच्या लोकार्पणप्रसंगी डॉ. विक्रम बांदल, विक्रमसिंह पाटील, स्वप्नील खामकर.

### ८. Digital स्क्रीन

छ. शिवाजी महाराज चौक येथे digital स्क्रीन बसविण्यात आली आहे. यावर वायू गुणवत्ता दर्शवली जाते तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करिता संदेश दाखविले जातात.

९. FSTP ची क्षमता वाढविण्यात आली आहे.





१०. औक्शिजन ट्रि बसविण्यात आला आहे.



११. नगरपरिषद मध्ये नवीन CNG आधारित घंटागाडी चा समावेश





**१२. कापडी पिशवी केंद्र**

नागरिकांना कमी सवलत दरात कापडी पिशवी मिळावी याकरिता व्यापारी व सार्वजनिक भागात ५ कापडी पिशवी मशीन बसविण्यात आले आहेत.






# पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच विटा नगरपालिकेचा अनोखा उपक्रम

## विटा नगरवासीयांसाठी खुले केले कापडी पिशवी केंद्र

। ललकार वृत्त ।

विटा, दि.२४ (वार्ताहर) – विटा नगरपरिषद नेहमीच विविध उपक्रम राबविणे करता अग्रेसर असते. स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या वतीने संपूर्ण शहरांमध्ये पिशवी नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी विविध ठिकाणी शहरात कापडी पिशवी मशीन बसवण्यात आली आहे. प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून आणि पर्यावरण संवर्धन, प्रदूषणाला आळा बसावा, या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम शहरवासियांसाठी सुरू करण्यात आली आहे. शहरातील नगरपालिका CFC शेजारी, भाजी मंडई अशा विविध सार्वजनिक व व्यापारी भागात हे कापडी वेंडिंग मशिन बसविण्यात आले असून ही सुविधा सर्व ▶▶ पान ७ वर

१३. शहरात विविध ठिकाणी सुशोभीकरण करण्यात आले आहे.

















१४. नगरपरिषद कार्यक्षेत्रात RRR (REDUCE , REUSE, RECYCLE) केंद्र चालू करण्यात आले आहे.

१५. स्मशानभूमी येथे अत्याधुनिक सुविधांचे नवीन बेस्ट शौचालय बांधण्यात आले आहे.

१६. Air Purifier




१७. विटा नगरपरिषद कार्यालयात २० kw क्षमतेचे Ongrid (नेट मीटरिंग) सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यात आलेला आहे. तसेच विवेकानंदनगर येथे १० kw क्षमतेचे पंप हाऊसला नेट मिटरिंग करणे काम प्रस्तावित आहे



१८. भाजी मंडई  व खाऊ गल्ली





१९. रस्त्यांची देखभाल व सुशोभिकरण, दिशा दर्शक फलक, लेन मार्किंग










## २०. सार्वजनिक व्यावसायिक व व्यापारी केंद्र- स्वच्छता व सुविधा, प्रसाधनगृहांची उपलब्धता






## २१. घरोघरी जाऊन १०० टक्के विलगीकृत कचरा संकलन करणे







- निवासी आणि व्यावसायिक क्षेत्र स्वच्छ केले जातात
- हाय एंड कलेक्शन वाहने
- 100% वेगवेगळा कचरा संकलन
- मार्ग मॅपिंगसह
- जीपीएस ट्रॅकिंग व मासिक तपशीलवार अहवाल

# विटा नगरपरिषद, विटा

जि. सांगली (ULB Code : 802893)




## My Vita City, Cleanest City, Green City

VITA NO 1

Clean & Smart City

स्वच्छ विटा    हरित विटा    सुंदर विटा